# University of Mumbai

परीक्षा विभाग
अभियांत्रिकी निकाल कक्ष,
महात्मा जोतीराव फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पुर्व)
मुंबई– ४०० ०९८

क्र.परीक्षा/अभियांत्रिकी निकाल कक्ष/ ८३ /२०१८

परिपत्रक:–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांना सुचित करण्यात येते की, मे, २०१८ (प्रथम सत्र उन्हाळी २०१८) मध्ये घेण्यात येणा–या अभियांत्रिकी पदवी परीक्षेच्या खालील नमुद केलेल्या शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या वेबलिंकवरुन online घेण्यात येणार आहे.

1) F.E. (Sem.I) (CBSGS/CBCGS)
2) F.E. (Sem.II) (CBSGS/CBCGS)
3) B.E. (Sem. VII) (CBSGS)
4) B.E. (Sem. VIII) (CBSGS)

वरील अभ्यासक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज उपरोक्त वेबलिंकवरुन Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:–

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | Online अर्जभरण्याची व Inward करण्याच्यातारखा | Form submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | नियमित शुल्क | ०९/०४/२०१८ते२०/०४/२०१८ | २४/०४/२०१८ |

वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील वरील नमूद केलेल्या परीक्षांसाठी प्रविष्ठ होण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेश अर्ज उपरोक्त वेबलिंकवर Online भरुन ते आपल्या महाविद्यालयाच्या Login मध्ये Inward करुन घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षा प्रवेश अर्जाची व Form submission Reportची प्रिंटस काढून, व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्ते पोच जमा करावी. **पोस्टाने अथवा कुरिअरने स्विकारले जाणार नाहीत.**

परीक्षा अर्ज विद्यापीठात जमा करताना या अर्जाचे सत्र निहाय, पॅटर्ननिहाय (Credit Based/Choice Based) शाखानिहाय असे गठ्ठे बांधुनच विद्यापीठात जमा करावे, जेणे करुन हया अर्जाची छाननी करणे सुलभ होईल.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता (२४/०४/२०१८ रोजी) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत **कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाही या बाबींची नोंद घेण्यात यावी.**

परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर यामध्ये कोणतीही दुरुस्तीकरता येणार नाही. यामुळे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनीसंबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्हीभाषेत) विषय व इतर सर्व माहिती अचूक व बरोबर याची खात्री करुन घ्यावी.

जे विद्यार्थी नोव्हेंबर २०१७ च्या परीक्षेस प्रविष्ठ होउन अनुत्तीर्ण असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्याचे प्रथम सत्र उन्हाळी २०१८ मध्ये होणा–या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज (Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता उपरोक्त विहित कालावधीत सादर करावेत.

.......२/

तसेच पुढे आपणांस असेही कळविण्यात येते की, B.E. (Sem VII & VIII) या सत्रासाठी प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज भरताना विद्यापीठ Ordinance ३७२९ व ३७३१या मधील नमुद असलेल्या तरतुदीचे तंतोतंत पालन करावे. या Ordinance मधील तरतुदीचाा उल्लघंन झाल्यास व यामुळे भविष्यात काही कायदेशीर/न्यायालयीन बाबी उदभवल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची असेल यांची नोद घ्यावी.

(Web Link :- mu.ac.in → exams & results → examination →Exam forms (All Exam) → follow the instructions given on the page)

स्थळ : मुंबई
दिनांक :– ०७ एप्रिल, २०१८

प्रा. (डॉ. अजुर्न पी घाटुळे)
स्था. संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अभियांत्रिकीच्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेशित

१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

ब. प्रत माहितीसाठी अग्रशित

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ
२. मा. कुलगुरु यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२
३. मा. प्र.कुलगुरु, मा. संचालक, बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियंत्रक यंचे स्विय सहायक

प्रा. (डॉ. अजुर्न पी घाटुळे)
स्था. संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ